पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

कार्यपत्रिका क्रमांक ८

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. १२/५/२००९** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **म.जोतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**माहितीसाठी आलेले विषय**

**विषय क्रं. ९८**

दि. १३/४/२००९ ते दि. १९/४/२००९ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण १३४ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांनी पत्र क्र. मआ/अशाद/४३ दि. ५/५/२००९ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**विषय क्रं. ९९**

दि. २०/४/२००९ ते दि. २६/४/२००९ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण ६४ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांनी पत्र क्र. मआ/अशाद/४४ दि. ५/५/२००९ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

UnRegistered

**हिशोब तपासणी अहवाल**

**विषय क्रं. १००**

मा.नगर अभियंता यांचे नियंत्रणाखालील बांधकाम विभागाकडील सन २००२-०३ ते सन २००६-०७ मध्ये बांधकाम प्रकरणी देणेत आलेल्या भोगवटापत्र प्रकरणांची तपासणीतील वडगांव शेरी स.नं. १५ मारी गोल्ड प्रा.लि. (आर्कि.चंद्रकिशोर राहतेकर) प्रकरणांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह बाबींबाबत मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं मुलेप/४५ दि. २८/४/२००९ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. १५ सन २००९-२०१० चा विचारासाठी.

**सेवकवर्गाची प्रकरणे**

**विषय क्रं. १०१**

श्री.धनंजय सदाशिव गायकवाड, कनिष्ठ अभियंता, वारजे कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालय यांचेविरुध्द अभियोग दाखल करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/उका/से/४२ दि. ४/५/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. १०२**

पुणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील शेड्यूलमान्य पदाच्या प्रचलित शैक्षणिक पात्रतेमध्ये कालानुरुप आवश्यक ते बदल करणे आपेक्षित आहे. त्या अनुषंगाने विविध शाखांची माहिती, खात्याची गरज, भविष्यात कार्यप्रणालीमध्ये करावे लागणारे बदल आणि अन्य परिणाम करणारे घटक इ.बाबींचा एकत्रित विचार करुन सर्व समावेशक असा मसुदा तयार करुन या मसुद्याला अंतिम स्वरुप देणे आहे. सदर काम हे अत्यंत महत्वाचे, अनिवार्य व कालमर्यादेचे आहे. प्राथमिक स्तरावरील सर्व कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे. प्रस्तावास कायदेशीर बाबी तपासून अंतिम स्वरुप देणेसाठी या क्षेत्रातील तज्ञ व अनुभवी व्यक्तीची अल्प मुदतीसाठी नेमणूक करणे आवश्यक आहे.

त्या अनुषंगाने या कामी श्री.मनोहर भाटे, माजी उप आयुक्त(विशेष) यांनी पुणे महानगरपालिकेच्या सेवेत प्रतिनियुक्तीवर आणि तत्पूर्वी सर्वाधिक काळ नगरपालिका प्रशासन या विभागात, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे येथे काम केले आहे. सध्या ते ऑल इंडिया इन्स्टिटयुट ऑफ लोकल सेल्फ गर्व्हमेंट या संस्थेमध्ये याच क्षेत्रात अध्यापन व मार्गदर्शनाचे काम तज्ञ व अनुभवी म्हणून करीत आहेत. त्यांची मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ७३ अन्वये ३ महिने मुदतीसाठी दरमहा एकवट रुपये १५,०००/- मुशाहिऱ्यावर करार पध्दतीने सेवा घेणेत येत असल्याची बाब निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/सका/४७ दि. ६/५/२००९ चे पत्र.

## मागील सभेचे विषय

**विषय क्रं. १०३**

Development of Geographical Information System For Pune Municipal Corporation कामी निविदा मागविली असता आलेल्या ४ निविदांपैकी ३ निविदा तांत्रिक दृष्टया पात्र ठरल्या असून RMSI Pvt Ltd या कंपनीने दिलेला दर सर्वात कमी असल्याने त्यांना वर्कऑर्डर देणेस व सदर कामापोटी येणारा खर्च र.रुपये २,१४,४९,८८६/- (र.रुपये दोन कोटी चौदा लाख एकोणपन्नास हजार आठशे श्याऐंशी फक्त) RMSI Pvt Ltd या कंपनीस आदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र.मआ/सांसं/१६ दि. १७/४/२००९ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ५/५/२००९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्रं. १०४**

वारजे जलकेंद्र येथे जलशुध्दीकरण केंद्र उभारणे - टप्पा क्र. २ कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडसपैकी ठेकेदार मे.जिओ मिलर आणि कंपनी प्रा.लि. यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ५९,०७,७३,६८१/- पेक्षा १३.२७१% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु. ६६,९१,७५,२५६=२० अधिक भाववाढ सुत्रानूसार येणाऱ्या रकमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र.मआ/पापु/प्र/३३ दि. २७/४/२००९ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ५/५/२००९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १०५**

मा.विरेंद्र किराड व मा.अशोक येनपुरे यांचे दि. ९/१/२००९ चे पत्र.

स्थायी समिती ठराव क्र. १८३७ दि. ६/१/२००९ चा फेरविचार करण्यात यावा. (आकाशचिन्ह व जाहिरात फलक यांच्या फी चे दरात वाढ करणेबाबत)

सदर ठरावाचा फेरविचार होईपर्यंत मा.महापालिका आयुक्त यांनी कार्यवाही करु नये तसेच सदरचा ठराव १ के खाली मा.मुख्य सभेत दाखल करु नये.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ५/५/२००९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्रं. १०६**

श्री.एरंडे राजेंद्र पुरुषोत्तम यांची विशेष कार्याधिकारी, सांख्यिकी म्हणून दि. १७/३/२००९ पासून ६ महिने मुदतीकरीता र.रुपये २५,०००/- दरमहा एकवट मोबदल्यावर करार पध्दतीने घेण्यात येत असलेली सेवा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ नुसार निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उका/स/२८ दि. २१/४/२००९ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ५/५/२००९ च्या सभेत ठरले होते.)

UnRegistered

## संकिर्ण

**विषय क्रं. १०७**

गंगाजळी निधीमध्ये उपलब्ध होणाऱ्या ८ कोटी रुपयांची १ वर्ष मुदतीसाठी गुंतवणूक करणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/मुले/४९ दि. ६/५/२००९ चे पत्र.

**सुनिल पारखी**
**उपनगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) मा.नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**

**स्थायी समिती**
**दाखल विषय – दि. १२/५/२००९**

**विषय क्रं. १०८**

मा.आबा बागुल, विरोधी पक्षनेता व मा.विरेंद्र किराड यांचे दि. १२/५/२००९ चे पत्र.

पथ विभागाकडील सन २००७–०८ व २००८–०९ या आर्थिक वर्षातील तरतुदीमधील काही कामातील तरतूद प्रत्यक्ष जागा ताब्यात नसल्याने, न्यायालयीन दावे, टेंडर कमी दराचे आल्याने इ.कारणामुळे शिल्लक राहणार असून काही अतिरिक्त रक्कम शिल्लक राहणार आहे. सदरची अतिरिक्त रक्कम सुरु असलेल्या प्रगतीतील व इतर कामांसाठी वापरणे शक्य आहे. उदा – बावधन अंतर्गत रस्ते करणे, चांदणी चौक ते रामनगर, सिंहगड रस्ता, धायरी मुख्य रस्ता, गजानन महाराज मंदिर, हडपसर परिसरातील रस्ते, येरवडा परिसर, बिबवेवाडी कोंढवा बुाा., घोरपडी परिसर, कर्वेनगर परिसरातील रस्ते इ.या कामासाठी तरतूद उपलब्ध नसून असल्यास अत्यल्प आहे. ही कामे चालू आर्थिक वर्षात पूर्ण करणे शक्य असून वर उल्लेख केलेल्या तरतूदीमधून करणेस मान्यता देण्यात यावी.

**विषय क्रं. १०९**

मा.अनिल भोसले, सभागृह नेता, मा.आबा बागुल, विरोधी पक्षनेता, मा.शाम देशपांडे व मा.उज्ज्वल केसकर यांचे दि. १२/५/२००९ चे पत्र.

स्थायी समिती ठराव क्र. २३३९ दि. २४/३/२००९ चा फेरविचार करण्यात यावा. (केंद्र शासन अनुदानित प्रकल्पाअंतर्गत काम करुन घेणारे मे.एन.बी.सी.सी.यांचेसमवेत सामंजस्य करार **(Memorandom of Understanding)** करणेस व प्रकल्प राबविणेस मे.हंजर बायोटेक एनर्जीस प्रा.लि. यांचेबरोबर सवलतीचा करारनामा **(Concession Agreememt)** करणेस व ५ वर्षाचे कालावधीनंतर त्यांना लँडफिल डेव्हलपमेंट व लँडफिल मेन्टेनन्स पोटी फी अदा करणेबाबत)

**विषय क्रं. ११०**

मा.अनिल भोसले, सभागृह नेता, आबा बागुल, विरोधी पक्षनेता, मा.अशोक येनपुरे, मा.शाम देशपांडे व मा.बाबु वागस्कर यांचे दि. १२/५/२००९ चे पत्र.

कचऱ्याबाबत पुणे शहरात जी परिस्थिती निर्माण झाली त्यावर यापुढे दर आठवड्यात चर्चा करण्यासाठी प्रत्येक स्थायी समितीत अहवाल सादर करण्यास मान्यता देण्यात यावी.

**विषय क्रं. १११**

नगरसचिव कार्यालयाकडील खाली नमूद केल्याप्रमाणे सेवकांची मुंबई प्रा.मनपा अधि.१०४० चे कलम ५३(२) अन्वये बढतीने नेमणूक करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.प्र.नगरसचिव यांचे क्र. ३४५ दि. १२/५/२००९ चे पत्र.

| क्र. | सेवकाचे नाव | सध्याचे पद व वे.श्रे. | बढतीचे पद व वे.श्रे. | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.पुरंदरे विनोद. | वरिष्ठ लघुलेखक(वे.श्रे.६५००–१४७५०+मान्य भत्ते + मान्य. वि.वे.) | निवडश्रेणी लघुलेखक (वे.श्रे.रू.८०००–१६७५० + मान्य भत्ते + मान्य वि.वे.) | श्री.चव्हाण रघुनाथ यांच्या सेवानिवृत्तीमुळे रिक्त होणा–या जागेवर बढतीने नेमणूक. |
| २ | श्री.वाघ कैलास. | स्टेनोग्राफर(वे.श्रे.रू.५५००–१२८५०+मान्यभत्ते+मान्य.वि.वे | वरिष्ठलघुलेखक(वे.श्रे.रू. ६५००–१४७५०+मान्य भत्ते +मान्य वि.वे.) | श्री.पुरंदरे विनोद यांच्या बढतीने रिक्त होणा–या जागेवर बढतीने नेमणूक. |

**विषय क्रं. ११२**

प्रभाग क्र. ११४, पर्वती जनता वसाहत येथे १० लक्ष लिटर्स क्षमतेची पाण्याची टाकी बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडसपैकी ठेकेदार मे.कैलास डी.बिरामणे यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ५९,४१,०९२/– पेक्षा ३४.९८% जास्त) (तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रु. ८०,१९,२८५=९८ अधिक भाववाढ सुत्रानूसार व तारांकित दरानुसार येणाऱ्या रकमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पापु(प्र)/५० दि. ११/५/२००९ चे पत्र.

**सुनिल पारखी**
**उपनगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

Unregistered